## जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत कामात झालेल्या गैरप्रकाराबाबत

नागपूर (प्रतिनिधी) हिंगोली जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत कामात झालेल्या गैरप्रकाराबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

हिंगोली जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत विविध कामे करण्याकरिता मोठया प्रमाणात निधी देण्यात आला, परंतु काही ठिकाणी समित्यांनी कामे न करता ती रक्कम उचलून घेतल्याने रक्कम वसूलीसाठी त्यांना नोटीस व गुन्हे दाखल करण्याचा इशारा यापूर्वी देण्यात आला, त्यामुळे समितीच्या अध्यक्षासह सचिवांकडून उर्व रित ६६ लाख रूपये रक्कम वसूलीसाठी त्यांच्या मालमत्तेचा शोध घेतला जाणार असल्याचे सप्टेंबर २०१३ मध्ये निदर्शनास आले असून जलस्वराज्य प्रकल्पातील कामात दोषी आढळून येणाऱ्या अध्यक्ष व सचिवांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच आजपर्यंत किती रक्कमेची वसूली करण्यात आली आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

हिंगोली जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत विविध कामे करण्याकरिता मोठया प्रमाणात निधी देण्यात आला असून काही ठिकाणी समित्यांनी कामे न करता ती रक्कम उचलून घेतल्याने रक्कम वसूलीसाठी त्यांना नोटीस व गुन्हे दाखल करण्याचा इशारा यापूर्वी देण्यात आल्याची बाब खरी आहे. मौजे रूद्रवाडी, बळसोड व करंजाळा या तीन ग्रामीण पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर झालेल्या कामाच्या मुल्यांकनापेक्षा जास्त उचल केल्यामुळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच जिल्यामधील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत ६२ समित्यांकडे प्रत्यक्षात उचल केलेली रक्कम व झालेल्या कामाचे मुल्यांकन या मधील तफावत १ कोटी १४ लाख ९५ हजार रूपये इतकी रक्कम वसुलपात्र म्हणून निश्चित करण्यात आली आहे, यापैकी ४५ लाख ८७ हजार रूपयांची रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे, असे लेखी उत्तर पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री दिलीप सोपल यांनी दिले.

## महानगरपालिकेच्या रूग्णालयातील  सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद अवस्थेत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

मुंबईतील रूग्णालये दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असताना मुंबई महानगरपालिकेच्या परेल येथील केईएम रूग्णालयातील सुमारे २३ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचबरोबर या रूग्णालयात पुरेसे सुरक्षारक्षकांचे बळ नसल्याने रूग्णालयाच्या सुरक्षेविषयी प्रश्न उपस्थित झाला असून येथील सुरक्षारक्षकांवर सुरक्षा व्यवस्थेचा प्रचंड ताण पडत आहे. केईएमसह मुंबईतील सर्व रूग्णालयांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तातडीने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर अधिवेशनात दाखल केला होता.

केईएम रूग्णालयात एकूण ४४ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले होते. पण रूग्णालयात नुतनीकरणाचे काम चालू असल्यामुळे सुमारे २५ कॅमेरे काढण्यात आलेले असून, सद्यःस्थितीत १९ कॅमेरे कार्यरत आहेत. रूग्णालयात नुतनीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर कॅमेरे पूर्ववत कार्यान्वत करण्यात येतील, असे लेखी उत्तर राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले. मुंबई महानगरपालिकेच्या तिन्ही रूग्णालयांमध्ये, तसेच १६ उपनगरीय रूग्णालयांमध्ये व महानगरपालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील कस्तुरबा रूग्णालय, क्षयरोग रूग्णालय समूह, शिवडी, कान, नाक व घसा रूग्णालय आणि नेत्र रूग्णालयांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले असून नादुरूस्त असलेले सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे, असेही मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे.